


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २११ •शुक्रवार, दि.३१ ऑक्टोबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# बच्चू कडूंना ताकद देण्यासाठी गेलेले मनोज जरांगे आंदोलकांवरच भडकले; डाव, प्रतिडाव... बरंच बोलले



**नागपुर । प्रतिनिधी**

शेतकरी कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी नागपुरात सुरू असलेल्या आंदोलनाच्या ठिकाणी गुरूवारी सकाळी मनोज जरांगे पाटील दाखल झाले. त्यांनी माजी आमदार बच्चू कडू व इतर शेतकरी नेत्यांची भेट घेत चर्चा केली. त्यानंतर या सर्वांची एकत्रित पत्रकार परिषद झाली. यावेळी जरांगे पाटील आंदोलकांवर भडकल्याचे पाहायला मिळाले. बच्चू कडू यांनी मीडियाशी संवाद साधल्यानंतर मनोज जरांगेंनी बोलण्यास सुरूवात केली. त्यावेळी काही आंदोलकांचा त्याठिकाणी गोंधळ सुरू असल्याचे त्यांना दिसले. त्यामुळे जरांगेचा पारा चढला. त्यांनी थेट या आंदोलकांकडून तिथून बाहेर काढण्याचे फर्मान सोडले. त्यानंतर जरांगे यांनी आंदोलकांना आंदोलन यशस्वी होण्यासाठी कसे वागावे, याचे धडेही दिले.


**● आपल्याला आंदोलन चालवायचे आहे. कुठल्याही आंदोलनाचा मुळ गाभा हा आंदोलक असतो, असे सांगत मनोज जरांगे पाटील यांनी शांततेत आंदोलन पुढे नेण्याचे आवाहन केले.**

# थेट अजित पवारांची बनवट सही केली, शिक्का मारून पत्र नियोजन कार्यालयात धाडलं

## आता थेट उपमुख्यमंत्र्यांच्या नावाचा वापर करुन फसवणूक करण्याचा प्रकार समोर आल्यानं प्रशासनात खळबळ उडाली आहे

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात वारंवार समोर येणाऱ्या या बनावट पत्र आणि ओळखपत्र फसवणुकीच्या घटनांमुळे प्रशासकीय यंत्रणेच्या सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना बीड जिल्ह्यातील प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवणारी घटना समोर आली आहे. थेट राज्याचे उपमुख्यमंत्री



आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार (यांच्या सहीचं बनावट पत्र जिल्हा नियोजन कार्यालयात सादर करण्यात आलं आहे. या प्रकारानंतर एका व्यक्तीविरोधात बीडमधील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय. माजलगाव तालुक्यातील लहामेवाडी येथील अशोक वाघमारे असे

▶▶ उर्वरित पान २ वर

# ओलीस, रेस्क्यू, गोळीबार अन् रोहित आर्यचा मृत्यू

## मुंबईतील आर. ए. स्टुडिओमध्ये नेमकं काय घडलं?



**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील पवई परिसरात आर. ए. स्टुडिओमध्ये २० मुलांना ओलीस ठेवणारा आरोपी रोहित आर्या पोलिस चकमकीत ठार झाला आहे. सर्व मुले सुरक्षितपणे वाचवण्यात आली आहेत. पोलिसांनी मुलांना एकामागून एक सुरक्षितपणे इमारतीतून खाली आणले. माहितीनुसार, गुरुवारी रोहित आर्याने स्टुडिओमध्ये ऑडिशनसाठी आलेल्या सुमारे १०० मुलांपैकी २० मुलांना आतमध्येच ओलीस बनवले होते. त्यानंतर त्याने एक व्हिडिओ प्रसिद्ध करून या घटनेची माहिती दिली. हा व्हिडिओ पोलिसांच्या हाती लागल्यानंतर खळबळ उडाली. तातडीने पोलिसांनी बचाव मोहीम हाती

▶▶ उर्वरित पान २ वर

**● पालकांमध्ये दहशतीचं वातावरण**

**या घटनेनंतर परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. पोलिस सध्या या प्रकरणाची चौकशी करत आहेत, रोहितसोबत आणखी कोणी या कटात सामील होतं का, याचा शोध घेतला जात आहे. मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात घडलेल्या या घटनेनंतर पालक वर्गामध्ये मोठी दहशत आणि चिंता पसरली आहे.**

# केजमध्ये कुंटणखान्यावर पोलिसांचा छापा; दलाल अटकेत, पिडीतेची मुक्तता

**केज । प्रतिनिधी**

धारुर रोडवरील भवानीनगर परिसरात चालणाऱ्या वेश्याव्यवसायावर केज पोलिसांनी गुरुवारी दुपारी छापा टाकत दलालाला रंगेहाथ पकडले. या कारवाईत एक पिडीत महिलेला मुक्त करण्यात आले असून, आरोपीविरुद्ध अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



ही कारवाई दि. २९ ऑक्टोबर रोजी दुपारी सुमारे २ वाजता करण्यात आली. केज ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक उमेश ज्ञानेश्वर निकम यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, मारुती भिवाजी चाटे (रा. तांबवा, ता. केज) हा स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी केज मधील भवानीमाळ, धारुर रोड येथील घरात महिलांना बोलावून वेश्याव्यवसाय चालवत असल्याची गुप्त माहिती पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस अधीक्षक, बीड यांच्या आदेशानुसार अनैतिक मानवी

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडच्या पालीतील कॅनरा बँक फोडली साडेअठरा लाखांची रोकड लंपास



**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील पाली येथे गुरुवारी पहाटे चोरट्यांनी कॅनरा बँकेत धाडसी चोरी केली. या घटनेत जवळपास अठरा लाख रुपयांची रोकड चोरट्यांनी लंपास केली असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांकडून मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी

▶▶ उर्वरित पान २ वर

# शेख महेबूब यांना जीवे मारण्याची धमकी!

## डॉ.संपदा मुंडे प्रकरणात लक्ष घातल्याने दिली धमकी

**बीड । प्रतिनिधी**

डॉक्टर संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणात लक्ष घालून, संबंधित आरोपींवर कडक कारवाईची मागणी केल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष शेख महेबूब यांना फोनद्वारे अश्लील भाषेत शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची खळबळजनक घटना समोर आली. याचा



व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणात शेख महेबूब यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी या प्रकरणातील आरोपींवर तात्काळ आणि कठोर कारवाई व्हावी यासाठी आवाज उठवला आहे. त्यांच्या या मागणीमुळे संतप्त झालेल्या अज्ञात

▶▶ उर्वरित पान २ वर

# ... तर जिल्हा परिषदला कुलूप ठोकू ; नवनाथ शिराळे यांचा इशारा



**बीड । प्रतिनिधी**

सध्या राज्यामध्ये महायुतीचे सरकार आहे आणि केंद्रामध्ये भारतीय जनता पार्टीचे सरकार आहे सर्व लोकांच्या हिताचे निर्णय घेणारे असे लोकप्रिय असणारे भारताचे मा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील सर्व ग्रामीण भागातील लोकांना घरपोच नळाचे शुद्ध पाणी मिळावे या उद्देशाने जलजीवन मशीन योजना ही सुरू केली आहे ही योजना भारतातील महाराष्ट्रासह अनेक

▶▶ उर्वरित पान २ वर

# डॉ. मुंडे आत्महत्या प्रकरण: कवडगाव ग्रामस्थ आक्रमक; पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन, उडी मारण्याचा प्रयत्न

**● ठाकरे गटाच्या सुषमा अंधारे नी खाली उतरवले**

**बीड । प्रतिनिधी**

फलटण येथील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणाचा एसआयटी मार्फत तपास व्हावा या मागणीसाठी महिला डॉक्टर यांच्या कवडगाव येथील ग्रामस्थ



आक्रमक झाले. ग्रामस्थांनी आज सकाळी पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केले. यावेळी ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे मृत महिला डॉक्टरच्या कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी वडवणी तालुक्यात गेल्या असता, त्यांनी आंदोलकांशी संवाद साधून आंदोलकांना खाली उतरण्याचे आवाहन केले. आपल्या गावात नाही तर फलटणला जाऊन आपण तिथे बोलू. ज्यांनी आपल्याला त्रास दिलाय, त्यांना त्रास झाला पाहिजे,

▶▶ उर्वरित पान २ वर

# बनसारोळा उपकेंद्रात अपहार; वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेविका आणि बँक मॅनेजरवर गुन्हा दाखल

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील बनसारोळा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अंतर्गत असलेल्या इस्थळ उपकेंद्रातील शासकीय निधी १ लाख १६ हजार ६९४ रुपयांचाअपहार केल्याप्रकरणी वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेविका आणि आयडीबीआय बँकेच्या शाखा अधिकाऱ्याविरुद्ध युसुफवडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अशोक शिवाजी गवळी यांच्या फिर्यादीनंतर करण्यात आली.

फिर्यादीनुसार, उपकेंद्र ईस्थळच्या बळकटीकरणासाठी शासनाकडून १,१६,६९४ रुपये निधी जून २०२४ मध्ये




आयडीबीआय बँक, शाखा बनसारोळा येथील खात्यावर जमा झाला होता. सदर निधी काढण्यासाठी सरपंच आणि अधिकृत सिग्नेटरी यांची संयुक्त सही आवश्यक होती. मात्र आरोग्य सेविका मनिषा पानसरे यांनी या खात्यातील निधी परस्पर काढल्याचे बँक स्टेटमेंटवरून स्पष्ट झाले. चौकशीदरम्यान असे आढळले की, आरोग्य सेविका पानसरे यांनी वैद्यकीय अधिकारी

▶▶ उर्वरित पान २ वर

# राज्यातील शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी यासाठी सरकारचा मोठा निर्णय



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी या मागणीसह प्रहार जनशक्तीचे प्रमुख बच्चू कडू आपल्या शिष्टमंडळासह मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी गेले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक दिग्गज मंत्री आणि अधिकाऱ्यांसोबत शेतकरी नेत्यांच्या शिष्टमंडळाची बैठक पार पडत आहे. ही बैठक पूर्ण होण्याआधीच एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. राज्य सरकारने शेतकरी कर्जमाफीसाठी एक पाऊल पुढे टाकलं आहे. याबाबतचा शासन निर्णय देखील जारी करण्यात आला आहे.

राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी उच्चाधिकारी समितीची स्थापना केली आहे. बच्चू कडू यांच्या आंदोलनानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. या समितीच्या अध्यक्षपदी स्वत: मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी असणार आहेत. या समितीने येत्या ६ महिन्यात शेतकरी कर्जमाफीबाबत अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कर्जमाफीसाठी ही समिती सरकारला शिफारसी सुचवणार असल्याची माहिती आहे. या समितीच्या स्थापनेबाबतचा जीआर समोर आला आहे. एकूण ९ जणांची ही समिती आहे. या समितीत विविध बँकांचे सदस्य आहेत. अल्पकालीन आणि दीर्घकालीन शिफारशी सुचविण्याचे काम समिती करणार आहे. समितीत महसूल, वित्त, कृषी, सहकार आणि पणन या विभागांचे अपर मुख्य सचिव यांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित, मुंबईचे अध्यक्ष तसेच बँक ऑफ महाराष्ट्रचे प्रतिनिधी या समितीत सामील आहेत.

शासन निर्णयात काय - काय म्हटलं आहे? महाराष्ट्रातील शेतकरी राज्याच्या ग्रामीण

▶▶ उर्वरित पान २ वर



# हेमंत ऋतुचर्या

आयुर्वेद हे जीवनाचे विज्ञान आहे, आणि त्यात जीवनाला त्याच्या शुद्ध स्वरुपात जगण्यासाठी सर्व ज्ञान आहे. आयुर्वेदाची मुलभूत तत्त्वे, ही मानव व निसर्ग यांच्यातील परस्परसंबधावर आधारित आहेत. आयुर्वेद सुखी जीवन, आरोग्य, रोग होवू न देणे व रोग झालेच तर त्यापासून मुक्ती यांचे मार्ग दाखवतो.

आयुर्वेदाचे मुख्य ध्येय म्हणजे आधीच निरोगी असलेल्या व्यक्तीचे आरोग्य राखने व शरीरातील तीन दोषांच्या असंतुलनाची दुरुस्ती करणे. हे दिनचर्या( वैयक्तिक दैनंदिन स्वतःची काळजी, पथ्ये) आणि ऋतुचर्या त्या त्या ऋतूतील पथ्ये यांचे पालन करून साध्य करता येते. प्रत्येक व्यक्तीची दिनचर्या व ऋतुचर्या, त्यांची प्रकृती (शरीर व मानस) विकृती ( असंतुलीस दोष), बल,अग्नी( पचनशक्ती) यांच्या आधारावर ठरते. दिनचर्या आणि ऋतूचर्या दोन्हींचे पालन केल्यास दोषांची नैसर्गिक हालचाल संतुलित होते व व्यक्ती रोगापासून मुक्त राहू शकते.आयुर्वेदात् एक वर्ष ची विभागनी आदान काल व विसर्ग काल अशी आहे .एका वर्षात सहा ऋतु प्रत्येक ऋतु साधारणतः दोन दोन महिने टीकतो. पण आता वातावरणात बदलामुळे यातही बदल दिसतो आदान कालात सूर्य उत्तरेकडे सरकतो. यात शिशिर, वसंत, ग्रीष्म हे ऋतू असतात.तर विसर्गकाळात सूर्य दक्षिणेकडे सरकतो. यात वर्षा, शरद,हेमंत हे तीन ऋतू असतात, तर विसर्ग काळात तीन ऋतु असतात.

या प्रत्येक ऋतूत, वातावरणाचा शरीरातील वात पित्त, कफ, या वर परीणाम होऊन त्यांचे प्रमाण कमी जास्त होऊन व्याधी निर्माण होतात त्यामुळे योग्य दिनचर्या व ऋतुचर्या मुळे तीन दोष संतुलित राहून रोग होण्यास प्रतिबंध होतो. हेमंत ऋतू: आता शरद ऋतू संपून हेमंत ऋतुची सुरवात झाली आहे.

पण वैश्विक पर्यावरण असंतुलनामुळे अशात बऱ्याचदा ऋतुमध्ये अनियमन दिसते. जसे. उन्हाळा , हिवाळा इ. ऋतूत अचानक पाऊस पडणे. पावसाळ्यात खूप उन पडणे असे मिथ्या योगामुळे उदोष संतुलन बिघडून व्याधी होतात. अयोग्य दीनचर्या व ऋतूचर्या मुळे अनेक रोग जसे हृदयरोग,मधुमेह, सांधेदुखी,केस पांढरे होणे, चष्मा लागणे, हे उतारवयात होणारे व्याधी आता ऐन तारुण्यात होताना दिसतात तर पंधरा सोळा वर्षे वयाच्या मुलीना –सुरु घेणारी मासिक पाळी, आता अकरा ते बारा वर्ष वयातच सुरू होताना दिसते. अशा वेळी आपण निरोगी राहण्यासाठी योग्य काळजी घेणे अत्यावश्यक आहे

हेमेत ऋतु म्हनजे – हिवाळ्याची सुरुवात असते. वातावरणात थंडी व रुक्षता वाढू लागते.त्यामुळे शरीरात वातदोष वाढू लागतो म्हणून आहात व विहार हे वात कमी करणारे असावेत.अग्नी पचनशक्ती वाढलेली असते.

आहार – हेमंत ऋतूमधे , मधूर, आंबट रसांचे जास्त सेवन करावे जसे मध, गुळ ,जूने तांदूळ डाळी, गोदुग्ध व गाईचे तूप, जीरे दालचीनी, लसूण, . मसाले, तिळ अक्रोड बदाम तेलुक्त बिया निरनिराळे गरम सूप इ. चे सेवन करावे. मांसाहारी व्यक्तींनी योग्य मात्रेत मांसाहार करावा .

विहार :– भरपूर




नियमित व्यायाम् – चालणे, धावणे सूर्यनमस्कार इ करावेत. सतत कार्यशील राहावे.एका ठिकाणी फार वेळ बसू नये. रात्री जागरण व दिवसा झोप टाळावी. कोवळ्या उन्हात दहा मिनिटे चालावे .तळपायाना तेलाने मालिश करावी.

पंचकर्म अभ्यंग मालिश.

जसे जून्या मशीनला तेल लावल्याने त्याचे कार्य आवाज न करता दीर्घ काळ चालते, , तसेच आपले शरीरही एक यंत्र असून त्यासाठी तिळ तेलाचा वापर हा अमृताप्रमाणे ठरतो.

अभ्यंग आचरेत् नित्यम्, सः जराश्रम – वात हा

नियमित अभ्यंगाने म्हातारपण दूर राहते श्रम दूर होतात व वातदोष कमी होतो. अभ्यंगामुळे शरीर, त्वचेचे पोषण होऊन दूषित घटक बहेर निघून, शरीर व सुडौल व उर्जावान होते. डोपामिन् हा आनंदी हारमोन जास्त प्रमाणात बनतो व आपण प्रसन्न राहतो.

मात्राबस्ती :शरीरात वातदोष कमी करणारे प्रभावी पंचकर्म – बस्ती होय, बस्तीमुळे गुडघेदुखी कंबरदुखी, मानदूखी, वातरक्त मणक्याचे आजार ,निद्रानाश, त्वचाविकार स्त्रीयांचे विकार आदी मध्ये परीणामकारक उपयोग होतो.

नस्य :

– नाकात दोन तीन थेंब तेलाचे टाकणे. जुनाट सर्दी, अलर्जी ,काना चे विकार, निद्रानाश केस गळणे, पांढरे होणे, कोंडा होणे, चाई, विद्यार्थीमध्ये एकाग्रता साठी याचा उपयोग होतो.

शिरोधारा : अतिशय आनंददायी पंचकर्म निद्रानाश केसांचे विकार, नैराश्य, चिंता. ,उच्च रक्तदाब, हृययाचे विकार, सोरायसिस साठी फायदेशीर ताणतणाव निर्माण करणाऱ्या परीक्षा देणारे विद्यार्थी, बौद्धिक काम करणारे, नैराश्य ,अतिचिंता करणारे इ नी हेमंत ऋतूमध्ये नक्की शिरोधारा घ्यावी

ॐ सर्वे भवन्तु सुखिनः । सर्वे सन्तु निरामयाः । सर्वे भद्राणी पश्यन्तु . मा कश्चित् दुःख भाग्भवेत् ।।

सर्वे सुखी होवो, सर्वे रोगमम ुक्त राहो, सर्वांचे मंगल होवो, कुणीही दुःखी न होवो.

**– डॉ. सौ. सुषमा प्रमोद शिंदे. एम.डी (आयुर्वेद मुंबई)**
**निरामय आयुर्वेद ,जालना रोड – बीड**
**९३७००१८४८४**

◆ पान 9 वरून पुढे...

## थेट अजित....

गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.
नेमका प्रकार काय ? मिळालेल्या माहितीनुसार, अशोक वाघमारे या व्यक्तीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाचा गैरवापर करत त्यांची बनावट सही आणि शिक्का वापरून एक पत्र तयार केलं. हे पत्र थेट जिल्हा नियोजन कार्यालय बीड येथे सादर करण्यात आलं. मात्र अधिकाऱ्यांच्या लक्षात संशयास्पद बाबी आल्यानंतर त्यांनी त्या पत्राची चौकशी केली असता सही बनावट असल्याचं स्पष्ट झालं. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने तातडीने पोलिसांशी संपर्क साधत वाघमारेविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. या प्रकरणाने प्रशासकीय यंत्रणेतील गोपनीयता आणि सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. उच्चपदस्थ नेत्यांच्या नावाने अशा प्रकारे बनावट पत्र सादर केल्याने प्रशासकीय कामकाजातील विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यापूर्वीही अशाच स्वरूपाचा प्रकार बीड जिल्ह्यात घडला होता. जुलै २०२५ मध्ये भाजप आमदार प्रसाद लाड यांच्या नावाने बनावट लेटरहेड आणि सही वापरून तब्बल तीन कोटी वीस लाख रुपयांचा निधी वर्ग करण्यात आल्याचं प्रकरण उघड झालं होतं. आता थेट उपमुख्यमंत्र्यांच्या नावाचा वापर करून फसवणूक करण्याचा प्रकार समोर आल्यानं प्रशासनात खळबळ उडाली आहे. केंद्रीय मंत्र्याचा पीए असल्याचा बनाव अन.. दरम्यान, अशाच स्वरूपाचा दुसरा बनावटगिरीचा प्रकार मुंबईतही उघडकीस आला आहे. केंद्रीय मंत्र्यांचा पीए असल्याचा बनाव करून मुंबई पोलीस आयुक्तांच्या जनता दरबारात शिरकाव करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन व्यक्तींना पोलिसांनी अटक केली आहे. धीरेंद्रकुमार व्यास आणि भरत मन अशी या दोघांची नावे आहेत. पोलीस आयुक्तालयात प्रवेश करताना धीरेंद्रकुमार व्यास याने स्वतःला केंद्रीय मंत्र्यांचा पीए असल्याचा दावा केला होता. मात्र पोलिसांना संशय आल्याने चौकशी करण्यात आली असता हा बनाव उघड झाला. या दोघांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## ओलीस, रेस्क्यू, ...

घेतली आणि अखेर सर्व मुलांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश आले.
पण, या घटनेपूर्वी रोहित आर्यने एक व्हिडिओ जारी केला होता. त्यात त्याने सांगितलं की, तो दहशतवादी नाही, तर काही प्रश्नांची उत्तरं मागत आहे. त्याने असंही म्हटलं की तो एकटा नाही, त्याच्या सोबत आणखी लोक आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, युट्युबर असलेल्या रोहितने सकाळी सुमारे मुलांना 'ॲक्टिंग वर्कशॉप'च्या नावाखाली स्टुडिओत बोलावलं होतं. काही वेळानंतर त्याने सुमारे ८० मुलांना सोडून दिलं, मात्र उरलेल्या मुलांना आतच थांबवलं. बराच वेळ मुलं बाहेर न आल्याने पालकांनी पोलिसांना कळवलं. पावणे दोन वाजताच्या सुमारास पोलिसांना कॉल आला, ज्यामध्ये माहिती दिली की एका व्यक्तीने महावीर क्लासिक नावाची बिल्डिंग आहे तिथे लहान मुलांना बंधक बनवून ठेवलं आहे. पोलिसांनी तात्काळ कॉलला प्रतिसाद देऊन इथे स्पेशल युनिट्स फोर्स बोलवली. त्यानंतर पवई पोलिस अधिकाऱ्यांनी बाथरुममधून एन्ट्री करुन आतील एका व्यक्तीच्या सहाय्याने सर्व मुलांची सुखरुप सुटका केली. एकूण १७ मुलं, १ वयस्कर आणि एक स्थानिक असे १९ लोक आतमध्ये होते. पोलिसांनी सांगितलं की, रोहित आर्यला अटक करताना त्याच्याकडून एक एअर गन आणि काही संशयास्पद रासायनिक पदार्थ जप्त करण्यात आले. तो पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना पोलिसांच्या प्रत्युत्तरात त्याला छातीत गोळी लागली. या घटनेनं मुंबईसह राज्यभरात खळबळ उडाली आहे. दरम्यान, पवई पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल वाघमारे यांनी किडनॅपर रोहित आर्यला गोळी मारली.

## केजमध्ये कुंटणखान्यावर...

वाहतूक प्रतिबंधक कक्षातील पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव यांच्यासह महिला पोलीस पथक केज येथे दाखल झाले. दोन पंच आणि एक डमी ग्राहक यांना सोबत घेऊन सापळा रचण्यात आला. डमी ग्राहकास आरोपीच्या घरात पाठविण्यात आले. ठरल्याप्रमाणे डमी ग्राहकाने इशारा दिल्यानंतर ४ वाजता पोलिसांनी छापा मारला. यावेळी आरोपी मारुती भिवाजी चाटे यास पकडले असता, त्याच्याकडे डमी ग्राहकाला दिलेली १,२०० रुपयांची रक्कम मिळून आली. घराच्या वरच्या मजल्यावरील खोलीत पोलीसांनी तपास केला असता, तिथे एक पिडीत महिला आणि डमी ग्राहक मिळाले. सदर महिलेकडे विचारपूस केली असता तिने सांगितले की, मूळ धाराशिव जिल्ह्यातील असून आरोपी मारुती चाटे याने तिला केज येथे बोलावून वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले असून प्रत्येक ग्राहकाकडून १,२०० रुपये घेतले जातात, त्यापैकी ७०० रुपये तिला दिले जातात आणि ५०० रुपये आरोपी स्वतः घेतो. या प्रकरणी केज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पीएसआय उमेश निकम करीत आहेत. सदर कारवाईत पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, पो. नि. स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उ.नि. पल्लवी जाधव, पोह. अहंकारे, दगडखैर, प्रदीप येवले, अशोक शिंदे व चालक योगेश निर्धार यांनी सहभाग घेतला. पोलिसांनी परिसरातील नागरिकांना अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांची माहिती तात्काळ पोलिसांना देण्याचे आवाहन केले आहे.

## बीडच्या पालीतील....

पहाटेच्या सुमारास बँकेच्या मागील बाजूची भिंत फोडून आत प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी गॅस कटरच्या सहाय्याने लॉकर तोडून रोकड काढून नेली. घटनेची माहिती मिळताच बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे अधिकारी तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी चोरट्यांनी वापरलेली साधने व पावलांचे ठसे, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू केले आहे.

## शेख महेबूब ...

व्यक्तींनी त्यांना फोन करून धमकी दिली आहे. धमकी देणारा फोन रणजितसिंह निंबाळकर यांच्या कार्यकर्त्यारनी केला असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात जोरदार सुरू आहे. मात्र, याबद्दल अद्याप कोणतीही अधिकृत माहिती किंवा पुरावा समोर आलेला नाही.या गंभीर धमकीनंतर शेख महेबूब यांनी याबाबत पोलिसांकडे तक्रार नोंदवली आहे की नाही, तसेच पोलिसांनी या प्रकरणी काय कारवाई केली आहे, याबद्दल माहिती समोर आली नाही. डॉ. संपदा मुंडे यांच्या कथित आत्महत्येच्या घटनेने सातारा जिल्ह्यातील राजकारण ढवळून निघाले आहे. या प्रकरणावर विविध नेत्यांनी प्रतिक्रिया दिल्या असून, आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी सातत्याने होत आहे. त्यातच, आता शेख महेबूब यांना धमकी मिळाल्याच्या घटनेमुळे या प्रकरणातील तणाव आणखी वाढला आहे.

## ... तर जिल्हा...

राज्यांमध्ये कार्यान्वित आहे सुरू आहे याच पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्याम ध्ये जिल्हा परिषद अंतर्गत जलजीवन मशीन चे प्रत्येक गावामध्ये पॉईंट सार्वजनिक विहिरी दिलेल्या आहेत सार्वजनिक या जल जीवन मशीन योजने अंतर्गत असलेल्या विहिरीमध्ये अनेक प्रकारचे बोगस कामे झाल्याच्या बातम्या व तक्रारी देखील वारंवार जिल्ह्यातील बहुतांश वर्तमानपत्रांमध्ये येत आहेत याच अनुषंगाने काही कामे काही गावातील खरोखर पूर्ण झालेली आहेत परंतु काही बोगस कामे या जलजीवन मशीन योजनेअंतर्गत झालेले आहेत या बोगस कामाच्या आधारे बिल उचलण्याचे काम काही पुढारी हे टक्केवारीवर काही भ्रष्ट झालेल्या अधिकाऱ्याच्या मार्फत करत आहेत याच पार्श्वभूमीवर आत्ताच शासनाकडून बीड जिल्हा परिषद जलजीवन मशीन या योजनेला २२०० कोटी रुपये निधी प्राप्त झाला आहे त्याच पार्श्वभूमीवर आता बीड जिल्ह्यातील गल्लो गल्ली मध्ये जमा झालेले काही भ्रष्ट पांढऱ्या कपड्यावरचे पांढरे पुढारी हे भ्रष्ट काही अधिकाऱ्याच्या मार्फत स्वतः ची पोळी भाजून घेण्यासाठी या आलेल्या बावीस कोटी निधीवर डल्ला म ारण्यासाठी प्रयत्न देखील सुरू असल्याचे समजते आहे परंतु ज्या गावातील जलजीवन मशीन योजनेचे काम पूर्ण झाले आहे जे पात्र लाभार्थी आहेत अशाच लाभार्थ्यांना हा निधी वाटप करण्यात यावा अन्यथा ब्लॅकलिस्टम ध्ये यादीतील लोकांना जर हा निधी वाटप केल्याचे निदर्शनास आले तर लोकशाही पद्धतीने बीड जिल्हा परिषदेला कुलूप ठोकू असा ठणठणीत इशारा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून हा ठोक इशारा दिला आहे या वर आता बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि ग्रामीण पाणीपुरवठाचे कार्यकारी अभियंता हे कशाप्रकारे लक्ष देतात पात्र लाभार्थ्यांनाच निधी वितरित करतात का ब्लॅक लिस्ट मधील यादीतील लाभार्थ्यांना हा हा आलेला निधी देतात यावर देखील आपण स्वतः लक्ष ठेवून आहोत हा निधी ब्लॅक लिस्ट यादी मधील लोकांना वितरित केला जातो का हे देखील पाहणे आता गरजेचे असल्याचे सर्व नागरिकांमधून बोलले जात आहे या मुळे आपण कटाक्षाने या महत्त्वाच्या विषयावर लक्ष केंद्रित केले असून हा असा जर आलेल्या बावीस कोटी निधीच्या बाबतीत गैरप्रकार ब्लॅक लिस्ट मधील यादी मधील लोकांना निधी वाटप केल्याचा जर निदर्शनास आला तर आपण लोकशाही मार्गाने बीड जिल्हा परिषदेला कुलूप ठोकू असा खणखणीत इशारा मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी प्रसिद्धी माध्यमाच्या माध्यमातून दिला आहे.

## डॉ. मुंडे आत्महत्या...

असे सुषमा अंधारे म्हणाल्या. बीडच्या वडवणी तालुक्यातील महिला डॉक्टरच्या गावातील नागरिकांकडून पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन सुरू करण्यात आले. त्यात आंदोलनादरम्यान आंदोलक आक्रमक झाले आणि त्यांनी पाण्याच्या टाकीवरून खाली उडी मारण्याचा प्रयत्न केला. आमची लेक गेली तरी यांना जाग येत नाही.. तिला न्याय मिळत नाही, हे प्रशासन येत नाही असे म्हणत संतप्त प्रतिक्रिया दिलीतुम्ही सगळे मला सोबत हवे आहात. त्यामुळे आता तुमची मोठी बहीण सांगते म्हणून खाली उतरा, असे आवाहन सुषमा अंधारे यांनी आंदोलकांना केले. इथे दुखवटा आहे. त्यात आणखी कुणाला मानसिक त्रास नको. आपल्या गावात नाही, तर त्यांच्या तिथे जाऊन आपल्याला काय ते बोलायचे आहे. आपल्याच माणसांना पुन्हा पुन्हा मानसिक त्रास देण्यात काय अर्थ आहे ? ज्यांनी आपल्याला त्रास दिलाय, त्यांना त्रास झाला पाहिजे. आपल्याच लोकांना त्रास होऊन उपयोग नाही, त्यामुळे तुम्ही खाली या, असे आवाहन सुषमा अंधारे यांनी आंदोलकांना केले. यानंतर सर्व आंदोलक खाली उतरले. देत आंदोलनकाने उडी मारण्याचा प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर त्यांनी अंगावर पेट्रोल ओतुन घेण्याचा प्रयत्न केला. अखेर इतर आंदोलकांनी आणि गावकऱ्यांनी त्यांना वेळीच रोखल्याने मोठा अनर्थ टळला. दरम्यान, याचवेळी सुषमा अंधारे पीडित कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी दाखल झाल्या असता, आधी त्यांनी आंदोलकांशी संवाद साधत त्यांना खाली येण्याचे आवाहन केले. सुसाईड नोटमधील नमूद लोक चौकशीच्या कक्षेत आणली नाहीत, तर आपण तीन नोव्हेंबरला फलटणला जायचे आहे. तेव्हा तुम्ही सगळे मला सोबत हवे आहात. त्यामुळे आता तुमची मोठी बहीण सांगते म्हणून खाली उतरा, असे आवाहन सुषमा अंधारे यांनी आंदोलकांना केले. इथे दुखवटा आहे. त्यात आणखी कुणाला मानसिक त्रास नको. आपल्या गावात नाही, तर त्यांच्या तिथे जाऊन आपल्याला काय ते बोलायचे आहे. आपल्याच माणसांना पुन्हा पुन्हा मानसिक त्रास देण्यात काय अर्थ आहे ? ज्यांनी आपल्याला त्रास दिलाय, त्यांना त्रास झाला पाहिजे. आपल्याच लोकांना त्रास होऊन उपयोग नाही, त्यामुळे तुम्ही खाली या, असे आवाहन सुषमा अंधारे यांनी आंदोलकांना केले. यानंतर सर्व आंदोलक खाली उतरले.

## बनसारोळा उपकेंद्रात....

डॉ. एजाजुद्दीन कमरुद्दीन मोमीन यांच्या सांगण्यावरून व शाखा अधिकाऱ्याच्या संगनमताने बँकेतून रक्कम काढली. बँकेकडूनही याबाबत पुष्टी मिळाली असून पानसरे यांना निधी काढण्याचा कोणताही अधिकार नव्हता, तरीही त्यांनी बेकायदेशीरपणे पैसे काढून शासनाची फसवणूक केली असल्याचे तपासादरम्यान सिद्ध झाले आहे. या प्रकारात आरोग्य सेविका मनिषा पानसरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. एजाजुद्दीन मोमीन आणि बनसारोळा आयडीबीआय बँक शाखाधिकारी या तिघांनी संगनम ताने शासकीय निधीचा अपहार केल्याचा आरोप आहे. या तिघांविरुद्ध फसवणूक व शासकीय निधीचा अपहार केल्याप्रकरणी युसुफवडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणाची चौकशी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गवळी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली असून जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा परिषद, बीड यांनीही संबंधितांवर कडक कारवाईचे आदेश दिले आहेत.

## राज्यातील शेतकऱ्यांची...

अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा भाग आहेत. तथापि, अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे अनेक वेळा पिकांचे नुकसान होते. पर्यायाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते. त्यामुळे बाधित शेतकरी शेती कर्जाची मुदतीत परतफेड करु शकत नाहीत. असे शेतकरी थकबाकीदार झाल्यामुळे त्यांना बँकांकडून नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊ शकत नाही. शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी यापूर्वी शासनाने छत्रपती शिवाजी म हाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ व महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना, २०१९ जाहिर करुन शेतकऱ्यांना वेळोवेळी भरीव मदत केली आहे. राज्यातील शेतकरी कर्जमाफीनंतरही वारंवार थकीत कर्जाच्या दुष्टचक्रामध्ये अडकत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून (वशलीं ीरि) कायम स्वरुपी सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. या दृष्टीने शासनास अभ्यासपूर्ण शिफारसी सादर करण्यासाठी श्री. प्रवीण परदेशी, मा. मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून त्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून (वशलीं ीरि) कायमस्वरुपी सोडवणूक करण्यासाठी व त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याबाबत अभ्यासपूर्ण शिफारसी शासनास सादर करण्यासाठी श्री. प्रवीण परदेशी, मा. मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत करण्यात येत आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## जुगार अड्ड्यावर...

बजाज डिस्कव्हर, बजाज बॉक्सर, बजाज प्लॅटीना) असा एकूण ₹ ३,४९,४७०/– (तीन लाख एकोणपन्नास हजार चारशे सत्तर रुपये) किम तीचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त करण्यात आला आहे. गुन्हा दाखल: या आरोपींविरुद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार बंदी कायदा प्रमाणे कायदेशीर फिर्याद नोंदविण्यात आली आहे. पुढील तपास पिंपळनेर पोलीस स्टेशन करत आहे. सदर कारवाई मा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपोअ सचिन पांडकर, उपविपोअ हनपुडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा पोलीस निरीक्षक मधुसूदन घूगे, पो उप नी गोलवाल, पोलीस अंमलदार शेळके, गरजे, मगर, ढाकणे पठाण, विघ्ने, तावरे यांनी केली आहे.

## लंपीचा धोका...

प्रमाण अधिक असल्याने लंपी रोगाचा फैलाव मोठ्या प्रमाणात होऊ शकतो याची खबरदारी म्हणून प्रशासनाने लस प्रत्येक शेतकर्याच्या बांधावर जाऊन देणे गरजेचे आहे तसेच पुढील धोका ओळखून लंपी सदृश्य जनावरांना वेगळे करण्यासाठी जनजागृती करणे महत्त्वाचे आहे कोरोना सारखाच हा आजार संसर्गजन्य असून मच्छर ,गोचीड व माशांसह अन्य कीटकांच्या माध्यमातून याचा प्रसार होत आहे जनावरांच्या अंगावर पुरळ उठणे , फोड्या उटणे ,गाठी येणे ,नाक तोंड गळणे ,डोळ्यात वर्ण उटणे ,पायावर जखमा होणे ,गर्भपात होणे ,भूक मंदावणे ,दूध कमी होणे आदी या रोगाची लक्षणे असून या सदृश्य जनावरांसाठी क्वारंटाईन सेंटर सुरू करणे अत्यंत गरजेचे असून पुढील धोका ओळखून घेणे गरजेचे आहे जिल्ह्यात सुमारे दोन लाख बैलजोडी सह गाई म्हशी असे पशुधन असून पशुधन वाचविण्यासाठी लंपी प्रतिबंधक लसीकरण करणे याशिवाय सध्या तरी पर्याय नसल्याने लसीकरण सुरू असले तरी लसीचा तुटवडा असल्याने पशुधन धोक्यात आहे शेतकर्यांनी जनावरांची काळजी घेणे गरजेचे आहे या परिस्थितीचा धोका ओळखून प्रशासनाने तात्काळ कवारटाईन सेंटर सुरू करावे अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे गेवराई तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तालुकाध्यक्ष महेश बेदरे यांनी केली आहे सदरील मागणीचा गांभीर्याने विचार करून निर्णय घ्यावा नसता पशुधन गेल्या शिवाय राहणार नाही जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी महाराष्ट्र च्या पशुसंवर्धन मंत्री आहे येवढे सर्व असताना शेतकार्यना आपली जनावरे गमवण्याची वेळ येऊ देऊ नये अशी अशा आहे

## धानोरा रोडचे....

कांता उपाध्ये, रुक्मिणी नागपुरे, शिल्पा पंडित, जालिंदर नाईकवाडे, सवासे सर , राजाभाऊ पिंपळकोठा उपस्थित होते यावेळी मुख्याधिकारी यांनी निवेदनाची दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना यासंदर्भात सूचना देत तात्काळ वर्क ऑर्डर करून रस्त्याचे काम सुरू करण्यात येईल असे आश्वासन त्यांनी दिले आहे.

## श्री राधा ही...

श्री.राकेशजी मोरे ठडड महाविद्यालयीन संघ चालक, श्री. महादेव गायकवाड ठडड ग्रामीण तालुका संघ प्रमुख यांनी दीप प्रज्वलनाचा विधी केला . या भव्य कार्यक्रमाद्वारे कथाव्यासजी आईच्या विविध लीलांचे वर्णन केले. श्री राधेचा महिमा वर्णन करताना साध्वीजी म्हणाल्या की राधा ही श्रीकृष्णाची आल्हादिनी शक्ती आहे. श्री राधा जी केवळ कोणताही काळ किंवा जगाशी बांधलेले एक पात्र नाही तर त्या एक महान भावना आहे जी प्रत्येक युगात भक्तांमध्ये प्रकट झाली आहे. मंगळवेढा मध्ये जन्मलेल्या कान्होपात्रा यांनी श्री राधा भावनाच अभिव्यक्त केला आहे. तिच्या जीवनकथेचे हृदयस्पर्शी वर्णन श्रवण करून भाविक भावनेने भारावून गेले. समुद्रमंथनातून माता महालक्ष्मी प्रकटीकरण लीलाचे विश्लेषण करताना साध्वीजींनी भक्तांना पुरुषार्थाचा अर्थ समजावून सांगितला आणि धर्माच्या आवश्यकतेवर भर दिला. समुद्रमंथनाच्या गहन संदर्भाचा दाखला देत साध्वीजींनी आध्यात्मिक समृद्धीवर भर दिला. सामाजिक आणि वैयक्तिक समृद्धीचा आधार म्हणून त्याचे वर्णन करण्यात आले. या घटनेला जागतिक संदर्भाशी जोडताना साध्वीजी म्हणाल्या की या जगात भौतिक प्रगतीची शिडी चढत असताना प्रत्येक व्यवस्थेत अचानक बिघाड का दिसून येतो. याचे कारण समृद्धीचा आधार पैसा आहे? कथेच्या शेवटच्या टप्प्यात साध्वीजींनी सर्वांना समाज आणि विश्व कल्याणाच्या उन्नतीसाठी काम करण्याची प्रेरणा दिली. यासाठी त्यांनी लोकांना त्यांचे तन, मन आणि धन उत्साहाने दान करण्यास प्रेरित केले. कथेच्या शेवटच्या टप्प्यात देवी महालक्ष्मी आणि भगवान विष्णू यांच्या संगीतमय विवाह सोहळ्यात भाविकांनी उत्साहाने सहभाग घेतला. या प्रसंगी दिव्य ज्योती जाग्रति संस्थेचे प्रचारक स्वामीजी व साध्विजी तसेच सदस्य भक्तगण देखील उपस्थित होते . दिव्य ज्योती जाग्रति संस्थान ही दिव्य गुरु सर्वश्री आशुतोष महाराज जी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापित आणि चालवली जाणारी आध्यात्मिक संस्था आहे. ही जगातील एकमेव आध्यात्मिक संस्था आहे जिथे देवाची मात्र चर्चा केली जात नाही तर शास्त्रांनी प्रमाणित केले आहे त्याप्रमाणे देवाचे थेट दर्शन देखील करून दिले जाते. ही संस्था सामाजिक बद्दल आणि सांस्कृतिक पुनर्जागरणासाठी 'आध्यात्मिक प्रबोधना' द्वारे, 'मानवाचे' जगाच्या मूलभूत घटकाचे, आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्यासाठी काम करत आहे.

## एमआयएमकडून बीड...

आयोगाने बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची तयारी जोरदार सुरू केली असून, नगरपालिका ,जिल्हा परिषद व पंचायत समि तीसाठी प्रारंभिक आरक्षणाची अधिसूचना १५ ऑक्टोबर २०२५ रोजी जारी झाली आहे. यामुळे निवडणुकीची रिंगण उत्तुंग होण्याची शक्यता आहे. एम आयएम पक्षाने या संधीचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांना प्रोत्साहन देताना, त्यांच्या सामाजिक योगदानावर व योग्य चांगल्या लोकांची उमेदवारीची निवड केली जाईल, असे स्पष्ट केले आहे. पक्षाच्या बीड जिल्हा कार्यालयातून जारी केलेल्या आवाहनात म्हटले आहे की, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती (नगराध्यक्ष , नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य आदी) निवडणूक लढवण्याच्या इच्छुकांनी आपले बायोडाटा, सामाजिक कार्याची सविस्तर माहिती असलेली फाइल व इतर कागदपत्रे तात्काळ जमा करावीत. पक्षाच्या तत्त्वांनुसारच उमेदवारी दिली जाईल. हे आवाहन पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी दिले असून, इच्छुकांनी ०३–११–२५ पर्यंत जमा करावी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यात एमआयएमचा प्रभाव वाढत असल्याने या निवडणुकीत पक्षाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. जिल्हा निवडणूक विभागानेही उमेदवारांसाठी आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली असून, नामांकन प्रक्रियेची तारीख लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. इच्छुक उमेदवारांनी पक्षाच्या कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# कर्जमाफी व शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत नागपूर येथे सुरू आंदोलनास वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांचा पाठिंबा

**• किसान सभेचे मुख्यमंत्र्यांना निवेदन**

**वडवणी । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांचा प्रश्नाला घेऊन चालू असलेल्या आंदोलन ज्याचे नेतृत्व अखिल भारतीय किसान सभेचे राज्य सचिव डॉ.अजित नवले, प्रहार संघटनेचे नेते बच्चुभाऊ कडू, शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी, रविकांत तुपकर,महादेव जानकर यासह इतर शेतकरी नेते करत आहेत. सदर आंदोलन शेतकऱ्यांच्या न्याय मागण्यासाठी संविधानिक मार्गाने चालू असताना सरकारने कपटनीतीचा वापर करून हे आंदोलन मोडीत काढण्याचे प्रयत्न केले. हे आंदोलन शेतकऱ्यांच्या रास्त मागण्यांना घेऊन चालू असल्यामुळे अखिल भारतीय किसान सभा वडवणी तालुका व शेतकऱ्यांच्या वतीने या आंदोलनाला जाहीर पाठिंबा तहसीलदार यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना पाठवण्यात आलेल्या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनाद्वारे १. सरसकट शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करा. २. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेली मदत भरीव व विना अडथळा शेतकऱ्यांना तात्काळ वाटप करा. ३. उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा गृहीत धरून रास्त हमीभाव शेतकऱ्यांच्या पदरात पाडून देण्याची व्यवस्था निर्माण करा. ४. सोयाबीन,कापूस शासकीय खरेदी केंद्र तात्काळ चालू करा. ५. विद्यार्थ्यांची संपूर्ण शैक्षणिक शुल्क माफी करण्यात यावी. ६. विद्यार्थ्यांना मोफत बस पास व रेल्वे पास देण्यात यावा या व अन्य मागण्या करण्यात आल्या. यावेळी शेतकरी,कामगार नेते कॉ. ओम पुरी, विद्यार्थी नेते लहू खारगे, कॉ. भागवत झाटे, पप्पू आजबे ,शरद फरताडे ,बाबासाहेब व्हावळकर, रामप्रसाद कोल्हे, शरद फरतडे, यशवंत अनभूले ,रवींद्र जाधव, विकास मुंडे, सुंदरराव बादाडे, नागनाथ जगनाडे, गणेश गोंडे, भगवान गोंडे, विष्णू गवळी, गीज्ञानदेव राठोड, नामदेव राठोड, नानाभाऊ बादाडे यांच्या सह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# बच्चु भाऊ कडू यांच्या शेतकऱ्यांना कर्जमाफीसाठी आंदोलनाला पाठिंबा; लिंबागणेश येथे निदर्शने

**लिंबागणेश । प्रतिनिधी**



शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मुख्य मागणीसह विविध शेतकरीविषयक मागण्यांसाठी प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी मंत्री बच्चु भाऊ कडू यांच्या नेतृत्वाखाली नागपूर येथे सुरू असलेल्या चक्का जाम आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी आज लिंबागणेश येथे सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज चौकात निदर्शने करण्यात आली. आपला भिडू बच्चु कडू! शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी झालीच पाहिजे, सातबारा कोरा झालाच पाहिजे, बच्चु भाऊ तुम आगे बढो – हम तुम्हारे साथ है! अशा घोषणाबाजीने परिसर दुमदुमून गेला. सरकारने निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना सातबारा कोरा करून संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले होते; मात्र ते आश्वासन हवेतच विरले, असा आरोप या निदर्शनातून करण्यात आला. दिलेले आश्वासन तातडीने पाळावे आणि विनाकारण चर्चेचे गुऱ्हाळ लांबवू नये, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली.

ते म्हणाले, महाराष्ट्रात दररोज १०–१२ शेतकरी आत्महत्या करत आहेत. अतिवृष्टीमुळे शेती उद्ध्वस्त झाली आहे. अशा परिस्थितीत बच्चु भाऊ कडू यांच्या कर्जमाफीसह इतर मागण्या सरकारने तातडीने मान्य कराव्यात, हीच खरी शेतकऱ्यांना उभारी देणारी कृती ठरेल. या मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच कृषीमंत्री यांना पाठविण्यात आले आहे. यावेळी आंदोलनात राजेभाऊ गिरे, पांडुरंग वाणी, शिवशक्ती–भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, विक्रांत वाणी, सर्पमित्र अशोक जाधव, दामोदर थोरात, संजय घोलप, संतोष भोसले, सुदाम मुळे, उद्धव वाणी, शहादेव कोल्हे, गणपत तागड, सय्यद रफिक, गणेश घाडगे, भालचंद्र कुदळे, गुलाब कांबळे, सुदाम वाणी, प्रमोद निर्मळ, रामा वाणी, रमेश वाणी, सुंदरभाऊ जाधव, राजेभाऊ मंडलिक, कचरू निर्मळ, मारूती नाईगडे, मनोहर वाणी, शेख मुसाभाई, मेघराज येडे, गजेंद्र मोरे तसेच स्थानिक शेतकरी, युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सावरगाव पंचायत समिती गणातून अजिंक्य वाघमारे निवडणुकीच्या रिंगणात

## जयसिंह सोंळके यांच्या नेतृत्वाखाली विकासाच्या नव्या पर्वाची घोषणा

**माजलगाव । प्रतिनिधी**



सावरगाव स्थानिक राजकारणात नवचैतन्य निर्माण करणारी घडामोड सावरगाव परिसरात पाहायला मिळत आहे. जयसिंह सोंळके यांच्या नेतृत्वाखाली सावरगाव पंचायत समिती गणातून तरुण आणि ऊर्जावान कार्यकर्ते अजिंक्य वाघमारे यांनी आगामी पंचायत समिती निवडणुकीत इच्छुक असल्याचे जाहीर केली आहे. त्यांच्या या निर्णयामुळे गणातील राजकारणात नव्या समीकरणांची निर्मिती होण्याची चिन्हे दिसत आहेत. अजिंक्य वाघमारे हे गेल्या काही वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक आणि युवक संघटनांमधून कार्यरत आहेत. स्थानिक समस्यांवर त्यांनी सातत्याने आवाज उठवला असून, ग्रामीण भागातील तरुणांसाठी रोजगारनिर्मिती, शिक्षणातील गुणवत्ता आणि कृषी क्षेत्रातील सुधारणा या विषयांवर त्यांनी नेहमीच ठाम भूमिका मांडली आहे. त्यामुळे त्यांना तरुण मतदारवर्गाचा मोठा पाठिंबा मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जयसिंह सोंळके यांच्या नेतृत्वाखाली वाघमारे यांच्या प्रचाराचा पाया विकास आणि जनसेवा या दोन मुद्द्यांवर आधारित असणार आहे. सोंळके यांनी यापूर्वी स्थानिक पातळीवर अनेक विकासकामे हाती घेतली असून, त्यांच्यावर ग्रामस्थांचा विश्वास आहे. या पार्श्वभूमीवर वाघमारे यांच्या उमेदवारीला स्थानिक जनतेकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. अजिंक्य वाघमारे यांनी आपल्या निवेदनात सांगितले की, गावातील प्रत्येक घटकाचा विकास हेच माझं ध्येय आहे. पंचायत समिती ही गावागावातील विकासाची पहिली पायरी आहे आणि या पायरीवरूनच ग्रामीण भागाला नवी दिशा देण्याचा माझा प्रयत्न असेल. त्यांनी पुढे म्हटलं की, सावरगाव गणातील प्रत्येक नागरिकाच्या अडचणी समजून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील राहतील. दरम्यान, सावरगाव आणि परिसरातील राजकीय वातावरण हळूहळू रंगू लागले आहे. वाघमारे यांच्या उमेदवारीमुळे या गणातील निवडणूक अधिक चुरशीची होण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.

# राजकीय दृष्टी ठेवून कडा सहकारी साखर कारखान्याच्या परवाना रद्द : मा.आ. भिमराव धोंडे

## सभासदाचा सहकारी साखर कारखाना वाचवण्यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

**आष्टी । प्रतिनिधी**



माजी आ.स्व.श्रीपतराव कदम, गहिनाथ पाटील,माजी आ. भाऊसाहेब आजबे,माजी आ. निवृत्तीराव उगले,स्वातंत्र्य सैनिक स्व.साहेबराव थोरवे, भाऊसाहेब वाळके,विठ्ठलराव रेडेकर हे आणि यांच्यासारखे मान्यवरांनी कडा सह.साखर कारखाना उभारण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केलेले आहेत. त्यांच्या या स्वप्नातील वास्तुला वाचविले पाहिजे.कडा सह.साखर कारखान्याचे लायसन्स रद्द झाल्याने ते लायसन्स मिळविण्यासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन केले जाणार आहे.आजपर्यंत मी कधीच सत्तेत असताना कुणाचेच कामे आडवली नाहीत आणि आता आपण कारखाना सुरू करीत असतांना तालुक्यातील राजकारण्यांनी कुरघोडी व आडवा आडवी न करता मतदार संघाच्या हितासाठी एकत्र येण्याची गरज आहे. आमदारसाहेब राजकीय व्देष न करता आणखी दोन कारखान्याने सुरु करा आमचे दुमत अथवा विरोध नाही. राजकीय दृष्टी ठेवुन कडा सहकारी साखर कारखाना सुरु करण्यासाठी खोडा घालु नका. आणखी दोन कारखाने सुरु करा आमचा कसलाही विरोध नाही असे प्रतिपादन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले. आष्टी येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.माजी आमदार भीमराव धोंडे यांनी माध्यमांशी बोलताना पुढे सांगितले की,आष्टी तालुक्यातील कडा (महेश) सहकारी साखर कारखान्याचा परवाना साखर आयुक्त यांनी कसलीच पुर्व कल्पना न देता रद्द केला आहे. त्याविरोधात आज दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी बीड येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांसह धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.पहिल्या पिढीतील कारभारी मंडळी यांनी हा कारखाना उभारणीत माजी आ.स्व. श्रीपतराव कदम, गहिनाथ पाटील,माजी आ. भाऊसाहेब आजबे,माजी आ. निवृत्तीराव उगले,स्वातंत्र्य सैनिक स्व.साहेबराव थोरवे, भाऊसाहेब वाळके यांचे मोठे योगदान आहे. त्यानंतर आपण आमदार असतांना हा कारखाना निवडणुकीतुन जिंकला आणि जवळपास २५ वर्ष कारखाना चालविला. त्यानंतर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने आपल्या कारखान्यासह राज्यातील बरेच कारखाने बंद पडले.त्यामुळे हा कारखाना आवसायानात निघाला होता. आता परत ओटीएस मधून रितसर हा कारखाना पैसे भरून संचालक मंडळाने घेतला आहे. यामध्ये राजकारण करत हा कारखाना सुरू न व्हावा म्हणून सत्ताधारी आमदार सुरेश धस हे खोडा घालत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

सहकारी साखर कारखान्याचा परवाना रद्द करण्याची देशातील पहिली वेळ – खाजगी कारखान्याचा आणि सहकारी कारखान्याचा काहीही संबंध नसतांना या कारखान्याचा परवाना कमी अंतर असल्याचे कारण दाखवून हा परवाना रद्द करण्यात आला आहे.

# आदिवासी विकास विभाग व असुदे फाऊंडेशनमध्ये सामंजस्य करार

**मुंबई । प्रतिनिधी**

आदिवासी विद्यार्थ्यांच्या भविष्याला आकार देण्यासाठी आदिवासी विकास विभागाने असुदे फाऊंडेशनसोबत सामंजस्य करार केला. या कराराअंतर्गत "industryconnect.app' या तंत्रज्ञान आधारित प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून अनुभवाधारित करिअर मार्गदर्शन उपक्रम ठाणे अपर आयुक्त कार्यालय अंतर्गत येणाऱ्या १११ शासकीय आश्रम शाळांमध्ये राबवण्यात येणार आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही. सी. जोशी, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १५९९/२०२५**

**मंगल भ्र. बबन येडे वि. निरंक**

ज्यापेक्षा बबन रावसाहेब येडे हया दिनांक ११.०९.२०२५ रोजी अंजनवती, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत आणि तसेच अर्जदार– १. मंगल भ्र. बबन येडे, वय ७० वर्ष, धंदा शेती, रा. अंजनवती, ता. जि. बीड, २. शिवमूर्ती पि. बबन येडे, वय ४५ वर्ष, धंदा शेती, रा. अंजनवती, ता. जि. बीड, ३. गोकुळ पि. बबन येडे, वय ३६ वर्ष, धंदा शेती, रा. अंजनवती, ता. जि. बीड, ४. भारत पि. बबन येडे, वय ३४ वर्ष, धंदा – शेती, रा. अंजनवती, ता. जि. बीड, ५. शामल भ्र. कृष्णा काळे, वय ३९ वर्ष, धंदा – घरकाम, रा. बोलेगाव, ता. घनसांगवी, जि. जालना

अर्जदार क्रं. १ ही मयत नामे बबन रावसाहेब येडे यांची मुलगी असून, अर्जदार क्रं. २ ते ४ ही मुले आहेत, तर अर्जदार क्रं. ५ ही मयताची विवाहित मुलगी आहे. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत बबन रावसाहेब येडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी. प्रकरणाची पुढील तारीख ०८/१२/२०२५ आहे.

आज दिनांक ३० ऑक्टोबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

(ॲड. योगेश टेकाडे यांच्यामार्फत)
(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

## चौकशीची जाहीर नोटीस

एस. आर. एन. क्रमांक: BED/02177/18/25
फेरफार अहवाल / अर्ज क्रमांक: .........
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर बार्शी रोड बीड ता. जि. बीड बाबत
न्यासाचा पत्ता :– बार्शी रोड बीड, ता. जि. बीड, बीड, बीड, बीड
अर्जदार नवनाथ मोतीराम शिराळे,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, बीड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:–

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | The temple is made entirely of stone and the area of the temple is 83.53 sq.m. | 8000000.00 |

**(अ) जंगम मिळकत:– रोख रु. ८००००००/– मात्र (अक्षरी रुपये ऐंशी लाख मात्र फक्त)**

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत / कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Beed | 1-3-784 | Barshi Road, Beed | 8000000 | 5 year | 8000000.00 |

**(ब) स्थावर मिळकत ८००००००/– (अक्षरी रुपये देशी लाख मात्र फक्त)**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

शिक्का

(स्वाक्षरीत)
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बीड

महाराष्ट्र शासन
वनविभाग
वन्यजीव विभाग छत्रपती संभाजीनगर
वनपरिक्षेत्र (वन्यजीव) नायगावं

## निविदा सुचना

जा.क्र./वपअ./योजना/ 347/2025-25, दिनांक:-30/10/2025

वनपरिक्षेत्र (वन्यजीव) नायगांव अंतर्गत असलेल्या नियतक्षेत्रातील खालील कामाकरीता मोहरबंद खुल्या पध्दतीने निविदा (बी-1) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय कामाची रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | डोंगरकिन्ही कं.नं. 360B वनतळे अस्तरिकरण करणे . | 567299 | 5673 | 100 |
| 2 | डोंगरकिन्ही कं.नं. 360B वनतळ खोदणे | 849131 | 8491 | 100 |
| 3 | डोमरी कं.नं. 371B गुरे प्रतीबंधक चर खोदणे (TCM) 06 हे | 345935 | 3459 | 100 |
| 4 | नाळवंडी सं.नं. 185 गॅबीयन बंधारे बांधणे. | 992655 | 9926 | 100 |
| 5 | निरगुडी कं.नं.367, गुरे प्रतीबंधक चर खोदणे (TCM) 17 हे | 980150 | 9801 | 100 |
| 6 | बेदरवाडी कं.नं.368, गुरे प्रतीबंधक चर खोदणे (TCM) 12 हे. | 691871 | 6918 | 100 |
| 7 | खडकवाडी कं.नं.369 A गॅबीयन बंधारे बांधणे. | 983766 | 9837 | 100 |
| 8 | डोंगरकिन्ही कं.नं.361 गॅबीयन बंधारे बांधणे. | 992655 | 9926 | 100 |
| 9 | डोमरी कं.नं.372 A गॅबीयन बंधारे बांधणे. | 951440 | 9514 | 100 |
| 10 | डोमरी कं.नं.372 B गॅबीयन बंधारे बांधणे. | 992655 | 9926 | 100 |
| 11 | पिंपळगाव धस कं.नं.363 गॅबीयन बंधारे बांधणे. | 992655 | 9926 | 100 |

**अटी व शर्ती-**

1. आवश्यक त्या विभागाचा नोंदणीकृत ठेकेदार निविदा भरण्यास पात्र असेल.
2. अ) कोऱ्या निविदा विक्री दिनांक 01/11/2025 सकाळी 10:00 वाजेपासुन ते दिनांक 10/11/2025 रोजी संध्याकाळी 05:00 वाजेपर्यत केवळ कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत वनपरिक्षेत्र (वन्यजीव) नायगांव कार्यालयात उपलब्ध होतील.
   ब) मोहरबंद निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक 10/11/2025 रोजी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत.
   क) निविदा उघडण्याचा दिनांक 11/11/2025 रोजी कार्यालयीन वेळेत किंवा प्रशासकीय सोयीनुसार.
3. निविदा पोटी इसारा रक्कम लेखा विभागात रोखीने भरुन पावतीची मुळ प्रत व ठेकेदाराचे आवश्यक कागदपत्राच्या सत्यप्रती लिफाफा क्र. 01 च्या आत ठेवुन व या लिफाफावर अनामत पावतीचा तपशिल लिहून लिफाफा क्र. 01 व लिफाफा क्र. 02 निविदा सीलबंद करुन वनपरिक्षेत्र (वन्यजीव) कार्यालयात दाखल करावेत.
4. इसारा रक्कमेचा डी. डी. हा कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा कोणत्याही शेड्युल बॅकेचा विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) छत्रपती संभाजीनगर यांचे नावाने सादर करावा.
5. सदर कामाचा कालावधी हा चालु 2025-26 या वर्षाचा असुन सर्व कामे याच वर्षात पुर्ण करणे बंधनकारक राहील.
6. या जाहिरातीबाबत अधिक माहिती वनपरिक्षेत्र (वन्यजीव) नायगांव यांच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेली आहे. व अधिकच्या माहितीसाठी या कार्यालयास संपर्क करावा.
7. प्राप्त निविदा पैकी कोणतीही निविदा स्विकारणे अथवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार वन्यजीव वनविभाग छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवला आहे. याची कारणे दिली जाणार नाहीत.

सही/-
वनपरिक्षेत्र अधिकारी,
(वन्यजीव) नायगांव.

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शुक्रवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२५ • पान ४

## थोडक्यात...

### पायाभूत सोयी सुविधा अनुदान योजनेसाठी प्रस्ताव सादर करावेत

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील धार्मिक अल्पसंख्यांक बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्थां, नगरपालिका, नगरपरिषद शाळा व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. सदर योजना सन २०२५-२६ या वर्षात राबविण्यात येत असून संस्थाचालकांनी या योजनेसाठीचे परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती बीड या कार्यालास दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६:१५ वाजेपर्यंत सादर करावेत मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी, असे जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी, सुधाकर चिंचाणे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे, ग्रंथालयासाठी अनुदान, शिक्षकांचे मानधन इत्यादी लाभ देण्यासाठी ही योजना सन २०१३ - १४ पासून राबविण्यात येत आहे. इच्छुक मदरशांनी या योजनेअंतर्गत विहित नमुन्यातील रितसर परिपूर्ण प्रस्ताव दिनांक ११.१०.२०१३ दिनांक २२.१०.२०२३ आणि दिनांक २१.८.२०२४ मधील शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती बीड या कार्यालयात दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ सायंकाळी ६:१५ वाजेपर्यंत सादर करावेत, मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी, असे जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी सुधाकर चिंचाणे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे राज्यात प्रतिवर्षीप्रमाणे चालू वर्षीही २७ ऑक्टोबर २०२५ ते ३ नोव्हेंबर २०२५ या कालावधी दक्षता जनजागृती सप्ताह २०२५(तळसळश्ररपलश्‍ुरीशपर्शीी थशशघ) भ्रष्टाचाराला नाही म्हणा राष्ट्रसाठी वचन बध्द व्हा! हा आयोजित करून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड येथे २७ ऑक्टोबर २०२५ रोजी बीड शहरात भ्रष्टाचार निर्मूलन जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. २७ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी वाजता सोपान चिटमपल्ले यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता जनजागृती सप्ताह २०२५चे उद्घाटन हे शपथ ग्रहण कार्यक्रम संपन्न झाला असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उप अधीक्षक सोपान चिट्टमपल्ले यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### बीडमध्ये २ नोव्हेंबरला धम्म चर्चा
**अनिल डोंगरे यांचे उपस्थित राहण्याचे आवाहन**



**बीड । प्रतिनिधी**

सम्यक गौतम बुद्धांचा धम्म जग बदलविणारे क्रांतिकारी तत्त्वज्ञान असून, अलीकडच्या काळात त्याला धर्माचे स्वरूप प्राप्त होत चालले आहे, हे खेदजनक आहे. धम्माला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टिकोनातून समजून घेण्यासाठी बुद्ध आणि त्यांचा धम्म : समकालीन आकलन' या विषयावर धम्म चर्चा आयोजित करण्यात आली आहे. ही चर्चा रविवार, दि. २ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता, हॉटेल निलकमल, बीड येथे पार पडणार आहे. या धम्म चर्चेला उपस्थित रहावे असे आवाहन, वंचितचे माजी जिल्हाध्यक्ष तथा आयोजक अनिल डोंगरे यांनी केले आहे. या धम्म चर्चेत डॉ. प्रकाश सिरसट आणि डॉ. उमेश बागडे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून विचार मांडणार आहेत. कार्यक्रमाचे उदघाटन जिल्हा कृषी अधीक्षक सुभाष साळवे यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी डॉ. विक्रम धन्वे राहणार आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. राजेश शिंदे करतील, तर सूत्रसंचालन सुनिल डोंगरे करणार आहेत. फुले-आंबेडकर विचार सभेचे संयोजक वंचितचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल डोंगरे, डॉ. बी. एन. जावळे आणि ॲड. तेजस वडमारे आहेत. धम्म चर्चेचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निमंत्रक रजनिकांत वाघमारे, प्रविण टाकणखार, युवराज जाधव, मल्हारी जाधव, सूरज निकाळजे, सुशीलकुमार उजगरे, संदिप सोनवणे, विक्रांत उजगरे, धनराज पारवे, आशिष जोगदंड, आकाश कोकाटे, चंदू काळे, वैभव धवन, मयूर कांबळे, प्रताप बनसोडे, अनिकेत वडमारे, सूरज वाघमारे, आदर्श सोनवणे, अमित कोरडे, अभय इंगोले, ऋषी उघडे, सारंग जावळे, मनोज शिंदे, सिध्दार्थ पवळे परिश्रम घेत आहेत.

### ढेकणमोहा येथे डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया प्रतिबंधासाठी आरोग्य जनजागृती व सर्वेक्षण



**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे ढेकणमोहा येथे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ उल्हास गंडाळ व जिल्हा हिवताप अधिकारी श्री विजयसिंह शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा हिवताप कार्यालयामार्फत डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनिया या साथीच्या आजारांविषयी जनजागृती व सर्वेक्षण अभियान राबविण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश गावातील नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढविणे आणि डासजन्य रोगांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे हा होता. या प्रसंगी जिल्हा पर्यवेक्षक संजय धस यांनी उपस्थित नागरिकांना मौल्यवान आरोग्य मार्गदर्शन दिले. तसेच आरोग्य सहाय्यक पवळ, सगरे, आरोग्य कर्मचारी पठाण, शगीर, सानप, करपे, भिलारे, जाधव, मेखले, सातपुते, गव्हाणे आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान ढेकणमोहा गावात कंटेनर सर्वेक्षण करण्यात आले. दूषित पाण्याच्या कंटेनरमध्ये अबेट औषध टाकण्यात आले, तर काही कंटेनर रिकामे करण्यात आले. प्रत्येक घरात जाऊन नागरिकांना डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनिया प्रतिबंधक उपाययोजना समजावून सांगण्यात आल्या.

# निवडणूकीत गोंधळ घालणाऱ्यांवर प्रतिबंधक कारवाई करा

## विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांनी घेतला आढावा

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांनी गुरूवारी जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था आणि गुन्हेगारी नियंत्रण प्रणालीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर अधीक्षक सचिन पांडकर आणि चेतना तिडके यांची उपस्थिती होती. विशेष पोलीस महानिरीक्षक मिश्र यांनी पोलीस दलाला थेट आणि कडक निर्देश दिले. मागील निवडणूक काळात गुन्हे दाखल असलेल्या आरोपींवर तातडीने प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे त्यांनी स्पष्ट निर्देश दिले. या बैठकीत शरीराविरुद्धचे गुन्हे, मालमत्तेविरोधातील गुन्हे, विशेषतः चोऱ्या आणि घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यास सांगण्यात आले. त्यांनी पोलिस उपअधीक्षक आणि स्थानिक गुन्हे शाखा यांनी अवैध धंद्यांवर केलेल्या कारवायांचा आढावा घेतला. तसेच, आर्थिक गुन्हे शाखा आणि सायबर सेलच्या प्रलंबित तपासावर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले. अवैध धंद्यावर प्रभावी कारवाया करण्याच्या सूचना दिल्या.



अधिकारी अंमलदार यांचा गौरव- उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा यावेळी प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये बीड शहर, पिंपळनेर, परळी शहर, अंबाजोगाई ग्रामीण, नेकनूर, सह सुमारे १५ ते २० कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला.

पोलीस अधीक्षक वाचक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक वजूरकर हे नियत वयोमानानुसार उद्या दिनांक ३१/१०/२०२५ रोजी सेवानिवृत्त होत असल्यामुळे त्यांच्या उत्कृष्ट सेवेबद्दल प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

हरवलेली मुलांसंदर्भात कारवाई करा- मिश्र यांनी फरार आरोपींचा शोध घेणे, हरवलेली लहान मुले आणि अपहृत मुली यांचा तपास करणे तसेच जप्त केलेला मुद्देमाल फिर्यादीला परत करण्यासाठी प्रयत्न करणे आणि प्रलंबित अर्ज तातडीने निकाली काढणे अशा सूचना दिल्या. त्यांनी तपासात ई-साक्ष पचा प्रभावी वापर करण्यावरही भर दिला.

# जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा: पाच आरोपींना अटक, ₹ 3.49 लाखांचा मुद्देमाल जप्त

**बीड । प्रतिनिधी**

पिंपळनेर पोलिसांनी मौजे मैंदा शिवारात जुगार अड्ड्यावर छापा टाकून पाच इसमांना अटक केली आहे. आरोपींकडून ३,४९,४७०/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

कारवाईचा तपशील: पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मैंदा शिवारात, मैंदा फाटा ते गाडीउतार तांडा रोडच्या उजव्या बाजूला विटभट्टीजवळ लिंबाच्या झाडाखाली मोकळ्या जागेत काही इसम बेकायदेशीररित्या 'तिरट' नावाचा जुगार खेळत व खेळवत आहेत. या माहितीच्या आधारावर, पोलीस अंमलदार




वैजिनाथ चंद्रकांत मगर यांच्या फिर्यादीनुसार, सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुसूदन घूगे,आणि पोलीस उपनिरीक्षक अर्जुन गोलवाल यांच्या पथकाने सायंकाळी १६.३० वाजता अचानक छापा टाकला.

छाप्यादरम्यान, पाच इसम गोलाकारात बसलेले आणि जुगार खेळताना आढळून आले.

अटक आरोपींची नावे: सुभाष गोपिनाथ चव्हाण (वय ४० वर्षे), गंपु गुंडीबा कसबे (वय ६० वर्षे), दिलीप शिवाजी घोरड (वय ३२ वर्षे), हनुमंत रामभाऊ लोकरे (वय ३८ वर्षे), शिवाजी रंगनाथ कसबे (वय ५५ वर्षे), सर्व रा. मैंदा, ता. जि. बीड.

जप्त केलेला मुद्देमाल: रोख रक्कम, मोबाईल, आणि पाच मोटारसायकली (हिरो स्प्लेंडर पल्स,

▶ उर्वरित पान २ वर

# लंपीचा धोका ओळखून जिल्ह्यात जनावरांसाठी क्वारंटाईन सेंटर सुरू करा : महेश बेदरे

## गेवराई तालुक्यात 'लंपी'चा कहर

**गेवराई । प्रतिनिधी**

देशात राज्यासह अनेक जिल्ह्यांत लंपी आजाराने थैमान घातले आहे या आजाराचा धोका ओळखून बीड जिल्ह्यातील पशु धनावरील संभाव्य उद्धवणार्या परिस्थितील ओळखून तात्काळ प्रशासनाने लंपी सदृश्य जनावरांना वेगळे करून तातडीने कवारटाईन सेंटर सुरू करण्याची मागणी गेवराई तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष महेश बेदरे यांनी जिल्हाअधिकारी बीड यांच्याकडे केली आहे .

महेश बेदरे यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकामध्ये म्हटले आहे



की बीड जिल्ह्यात सर्वाधिक ऊस पुरवठा करणार्या ऊसतोड काम गाराकडे बैलजोडीसह गाई म्हशीचे

▶ उर्वरित पान २ वर

# धानोरा रोडचे काम तात्काळ सुरु करा : कांता उपाध्ये

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील नगर नाका ते पालवन चौक (धानोरा रोडचे) रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्याच्या मागणीसाठी नगरपरिषदेसमोर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात आले आहे याबाबत सविस्तर वृत्त असे की, शहरातील नगर नाका ते पालवन चौक रस्त्याची दुरावस्था झाली आहे या संदर्भात स्थानिक नागरिकांनी अनेक आंदोलन उपोषणे केल्याने प्रशासनाने तात्काळ हा रस्ता डीपीटीसी



अंतर्गत प्रस्तावित केला आहे आणि या संदर्भात निधी उपलब्ध झाला असून टेंडरिंग प्रोसेस देखील पूर्ण झाली आहे मात्र अद्यापही वर्क ऑर्डर न झाल्याने या या रस्त्याचे काम रखडलेले आहे तरी आचारसंहिता लागण्याच्या अगोदर हे काम सुरू करण्याचे यावे अशा मागणीचे निवेदन मुख्याधिकारी यांना आंदोलन नितेश उपाध्ये यांच्यासह बीड बचाओ मंचाचे नितीन जायभाय, डी.जी. तांदळे, अशोकजी येडे, फैसल सर, ▶ उर्वरित पान २ वर

# श्री राधा ही एक महान भावना आहे जी प्रत्येकामध्ये प्रकट होण्याची वाट पाहत आहे : साध्वी अदिती भारती

## देवी महालक्ष्मी आणि भगवान विष्णू यांच्या विवाह सोहळ्यात भाविक आनंदित

**माजलगाव । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथे सुरू असलेल्या श्रीमद् देवी भागवत महापुराण ज्ञानयज्ञ कथेच्या सहाव्या दिवसाची कथा सांगताना कथाव्यास साध्वी अदिती भारतीजीनी दुर्वासा ऋषींच्या शापामुळे इंद्राच्या संपत्तीचे नुकसान, स्वर्गातून देवी लक्ष्मीचे गायब होणे आणि समुद्रमंथनातून देवी सुरभीदेवी आणि देवी महालक्ष्मी यांचे प्रकटीकरण झाल्याच्या कथा सांगितल्या. सहाव्या दिवसाची कहाणी गोदा देवीच्या जीवनकथेच्या कथनाने



सुरू झाली ज्यामध्ये देवी राधेचा गौरव करण्यात आला.

कथेचे प्रमुख पाहुणे म्हणून ह.भ.प. किशन महाराज पवार अध्यक्ष मुकुंदराज महाराज मंदिर देवस्थान, श्री. अर्जुन वाहामारे तालुका प्रमुख शिवसेना (शिंदे गट), वीं. मकरंदनी पत्की अध्यक्ष दीनदयाल नागरी सहकारी बैंक, मा. गणेश जाधव. शहर प्रमुख शिव सेना शिंदे गट, श्री व सौ. अश्विनी महादेव साळुंके संचालक महेशचंद्र मंगल कार्यालय जवळगाव, श्री. पूनमचंद परदेशी ज्येष्ठ पत्रकार


▶ उर्वरित पान २ वर

# एमआयएमकडून बीड जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी उमेदवारांना आवाहन

## सामाजिक कार्याची फाइल व बायोडाटा जमा करा : शिवाजी भोसकर, सय्यद सैफअली (लालु)

**बीड । प्रतिनिधी**

येणाऱ्या नगरपालिका ,जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एमआयएम) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष बॅरिस्टर असदुद्दीन औवेसी, प्रदेश अध्यक्ष मा.खा.इम्तियाज जलील साहेब, प्रदेश सरचिटणीस समीर साजीद बिल्डर, मा मराठवाडा अध्यक्ष फेरोज लाला साहेब




यांच्या आदेशानुसार मा बीड जिल्हा अध्यक्ष ॲड शेख शफीक भाऊ यांच्या सुचनेनुसार बीड जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांना आपली कागदपत्रे जमा करण्याचे आवाहन केले आहे. पक्षाच्या वतीने हे आवाहन जारी करण्यात आले असून, निवडणूक लढवण्याच्या इच्छुकांना आपले बायोडाटा, सामाजिक कार्याची फाइल व इतर आवश्यक कागदपत्रे पक्षाच्या कार्यालयात सादर करावीत, असे सुचित करण्यात आले आहे.

माहितीनुसार, महाराष्ट्र राज्य निवडणूक ▶ उर्वरित पान २ वर

### खालील प्रमाणे संपर्क प्रमुख - बीड

- मा तालुका अध्यक्ष शेख एजाज, मा.शहराध्यक्ष शिवाजी भोसकर, मा.जिल्हा समन्वयक सय्यद सैफअली -९८२२५४८४९२, ९१११३३७३३७, ९२८४३६००७१
- माजलगाव - नगरसेवक इद्रिस पाशा, शेख युसुफ - ९०४९०००६६३, ९६८९६८६८६०
- अंबेजोगाई - हिफाजत पठाण, रमीज सर - ९८८१४५५९७७, ८९७५९२२२९२
- परळी - शेख मोहसीन - ९८५०८१९४२३
- धारुर - सिध्दीख भाई, शेख वसीम ,मोबीन सहाब, अफरोज पठाण, ८४८२९१७००१, ९५९५९४२२९४, ९६६५४७५३१३, ९२२६०१९२२६
- गेवराई - युनुस मामु, शेख फेरोज- ७८२२९४७४५७, ९९६०४२५४०६